संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज..
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
डॉ.सौ. चैताली समेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. समेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
उपलब्ध सुविधा
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफिद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफिद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : ११५ ● ● बुधवार दि. १३ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# खानापूर मतदारसंघातील विकास कामांना गती द्या, प्राधान्याने कार्यवाही व्हावी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे :आरोग्य, परिवहन, ग्रामविकास, जलसंधारणाच्या कामांचा आढावा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई : खानापूर मतदारसंघाच्या विकासासाठी दिवंगत आमदार अनिल बाबर यांनी खूप संघर्ष केला आहे. त्यांच्या पश्चातही या मतदार संघातील विकास कामांना प्राधान्याने गती दिली पाहिजे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिले.

सांगली जिल्ह्यातील खानापूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामे, सुविधांच्या आढाव्यासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. बैठकीस उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, सांगली जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुहास बाबर, अमोल बाबर तसेच परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, आरोग्य


**मुंबई येथे मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री शंभूराजे देसाई यांच्या उपस्थित खानापूर मतदार संघातील विविध विकास कामाबाबत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीला उपस्थित सुहास बाबर, अमोल बाबर व मान्यवर**

विभागाचे आयुक्त धीरज कुमार, परिवहन विभाग आयुक्त विवेक भीमनवार, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर आदी उपस्थित होते.


मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, दिवंगत आमदार बाबर यांचे आयुष्य संघर्षमय राहिले आहे. त्यांनी आपल्या मतदारसंघातील विकास कामांसाठी सातत्यपूर्णरित्या पाठपुरावा केला आहे. त्यांच्या मतदारसंघातील विकास कामांना आपल्याला गती द्यावी लागेल. त्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने आणि सकारात्मक दृष्ट्या कार्यवाही करावी.' विटा येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबत सकारात्मक आहोत. दरम्यान हे कार्यालय सुरु होईपर्यंत परिवहन खात्यातर्फे आयोजित केला जाणाऱ्या वाहन नोंदणीसह, विविध कामांसाठीची शिबिरांची संख्या दुपटीने वाढवावी.असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. एस.टी. महामंडळाच्या विटा, खानापूर, आटपाडी, खरसुंडी येथील आगार व बसस्थानकांच्या सुविधांबाबतही आढावा घेण्यात आला. या कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही.

# लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने प्रशिक्षणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आज राजकीय पक्षांची बैठक संपन्न झाली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी दीपक शिंदे, उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, जिल्हा परिषद मुख्य वित्त व लेखा अधिकारी विठ्ठल चव्हाण, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी यासीन पटेल, लेखाधिकारी विकास पाटील आदी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी आचारसंहिता, एम.सी.सी., कायदा व सुव्यवस्था याबाबत सविस्तर माहिती बैठकीत दिली. यावेळी त्यांनी आचारसंहिता लागू झाल्यानंतर लगेचच जिल्हास्तरावर २४_७ नियंत्रण कक्ष कार्यान्वीत केला जाईल असे सांगितले. १९५० हा टोल फ्री क्रमांकावर नागरिकांना समस्या, तक्रारी दाखल करता येतील.


**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने प्रशिक्षणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात राजकीय पक्षांची बैठक संपन्न झाली. बैठकीस उपस्थित अधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी**

ए.आर.ओ.स्तरावर देखील नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येईल असे सांगितले. आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक सूचना दिल्या. कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या. तसेच एक खिडकीतून आवश्यक विविध परवानग्या दिल्या जातील असे सांगितले.

उपजिल्हाधिकारी दीपक शिंदे यांनी नॉमिनेशन फॉर्म भरण्यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. उमेदवारांचा सूचक सांगली लोकसभा मतदारसंघातील असणे आवश्यक असल्याचे सांगितले. उमेदवार ऑनलाईनव्दारेही नॉमिनेशन फॉर्म भरू शकतो, उमेदवारांनी दाखल गुन्हे, झालेली शिक्षा याबाबत सविस्तर माहिती नॉमिनेशन फॉर्म भरताना द्यावी असे सांगितले.

यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे यांनी उमेदवार व निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांवर मार्गदर्शन करून उपस्थित पक्षाच्या प्रतिनिधींचे शंकानिरसन केले. तर जिल्हा परिषद मुख्य वित्त व लेखा अधिकारी विठ्ठल चव्हाण, लेखाधिकारी विकास पाटील यांनी उमेदवारांच्या खर्चाबाबत ठेवण्यात येणाऱ्या नोंदवह्या, खर्चाचा तपशील, दर, याबाबत सविस्तर माहिती दिली.

जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी यासीन पटेल यांनी ऑनलाईन नॉमिनेशन भरण्यासंदर्भात सविस्तर सादरीकरण केले. शेवटी प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी फारूख बागवान यांनी एमसीएमसी समितीच्या कामकाजाबाबत माहिती दिली. तसेच इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया आदी माध्यमातून उमेदवारांच्या जाहिराती प्रसारीत करण्यापूवी एमसीएमसी समितीकडून पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे सांगितले. या प्रशिक्षणासाठी संबंधित नोडल अधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेंतर्गत १६.२० कोटी निधी:डॉ.प्रशांत नारनवरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेअंतर्गत ७२ हजार पाच लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये १६.२० कोटी एवढा निधी जमा करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाच्या मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत कोरोनाच्या संसर्गामुळे एक किंवा दोन्ही पालक गमावलेल्या १० हजार २९० लाभार्थ्यांना २९०० प्रमाणे नऊ महिन्यासाठीचा रूपये २६.८६ कोटी एवढा निधी जमा करण्यात आला असल्याची माहिती, महिला व बालविकास आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिली आहे.

महिला व बालविकास विभागामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले संगोपन योजना राबविण्यात येत आहे. अनाथ, निराधार, निराश्रीत, कैद्यांची बालके, दुर्धर आजाराने ग्रस्त पालकांची बालके, भिक्षेकऱ्यांची बालके, कोरोना संसर्गामुळे एक पालक किंवा दोन्ही पालक गमावल्यामुळे अनाथ झालेल्या बालकांना पर्यायी कुटूंब उपलब्ध करून देणे, त्यांचे संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणामध्ये पुनर्वसन करण्याचा प्रयत्न या योजनेअंतर्गत करण्यात येतो. २०२३ - २४ या वित्तीय वर्षासाठी एकूण ७३ हजार ८९ बालकांची माहिती आयुक्तालय स्तरावर प्राप्त झाली आहे. त्यानुसार या बालकांना आयुक्तालय स्तरावरून रक्कम अदा करण्यात येणार असल्यामुळे प्रायोगिक तत्वावर एका महिन्याच्या लाभापोटीची रक्कम बँकेमध्ये जमा करण्यात आली होती. मात्र, खाते क्रमांक, के.वाय.सी. नसणे, अर्धवट खाते क्रमांक अशा विविध त्रुटींमुळे बालकांच्या खात्यामध्ये लाभाची रक्कम जमा झाली नाही. संबंधित त्रुटींची पुर्तता करून त्यानुसार ७२ हजार पाच लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये १६.२० कोटी एवढा निधी जमा


**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले**

करण्यात आला असल्याचे महिला व बालविकास आयुक्त डॉ. नारनवरे यांनी सांगितले.

याचबरोबर केंद्र शासनाच्या मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत सन २०२२ - २३ या वित्तीय वर्षाच्या प्रायोजकत्व, प्रतिपालकत्व आणि आफ्टर केअर सेवा या योजनेसाठी मंजूर निधीमधून कोरोना च्या संसर्गामुळे दोन्ही किंवा एक पालक गमावलेल्या १० हजार २९० लाभार्थ्यांना २९०० प्रमाणे नऊ महिन्यासाठीचा रूपये २६.८६ कोटी एवढा निधी जमा करण्यात आला आहे, असेही डॉ. नारनवरे यांनी सांगितले.

# खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव सवलतीच्या गुणांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी), उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्याअन्वये संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी खेळाडूचे परिपूर्ण प्रस्ताव विहित नमुन्यात जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल सांगली येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर यांनी केले आहे.

सन २०२३-२४ या वर्षातील सांगली जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / महाविद्यालयाचे ग्रेस गुण चे परिपूर्ण प्रस्ताव दोन प्रतीत पुढील वेळापत्रकाप्रमाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्याकडे सादर करावयाचे आहेत. दिनाक १२ मार्च २०२४ रोजी तासगाव व खानापूर तालुका, १३ मार्च रोजी मिरज व कवठेमहाकाळ, १४ मार्च रोजी जत व आटपाडी, १५ मार्च रोजी कडेगाव व पलूस, १८ मार्च रोजी शिराळा व वाळवा, १९ मार्च रोजी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्रस्ताव सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावयाचे आहेत.

# सामाजिक न्याय विभागामार्फत व्यक्ती व संस्थांना पुरस्कार जाहीर

## चार पुरस्कारांमध्ये जिल्ह्यातील ६ व्यक्ती व ३ संस्था यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून सामाजिक क्षेत्रात भरीव, मोलाची कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना विविध पुरस्कार प्रदान केले जातात. सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या वर्षासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहु, फुले, आंबेडकर पारितोषिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार या सहा पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून ७ मार्च २०२४ रोजी जाहीर करण्यात आली आहे. सहा पुरस्कारापैकी चार पुरस्कारांमध्ये सांगली जिल्ह्यातील ६ व्यक्ती व ३ संस्था यांची निवड झाली आहे. अशी माहिती समाज कल्याण सहाय्यक आयुक्त जयंत चाचरकर यांनी दिली.

पुरस्कार प्राप्त लाभार्थी यांना पुरस्कार प्रदान करण्यासाठीचा कार्यक्रम दि. ११ ते १४ मार्च २०२४ या कालावधीत मुंबई येथे आयोजित करण्यात आलेला असून मुख्य पुरस्कार वितरण कार्यक्रम हा नॅशनल सेंटर फॉर पर फॉर्मिंग आर्टस (NCP-) जमशेदजी भाभा नाट्यगृह, एनसीपीए मार्ग, नरिमन पॉईंट मुंबई येथे दि. १२ मार्च २०२४ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. पुरस्कार प्राप्त व्यक्ती व त्यांच्या सोबत त्यांची पती / पत्नी आणि पुरस्कार प्राप्त संस्थेचे दोन प्रतिनिधी यांना कार्यक्रमास शासनाकडून निमंत्रित केले जाते. याबाबत श्री. चाचरकर यांच्याव्दारे पुरस्कार्थींना व्यक्तीशः भेट व पुष्पगुच्छ देवून निवडीबद्दल अभिनंदन करण्यात आले आहे.

पुरस्कार्थी व्यक्ती/संस्थेचे नाव व पत्ता, प्राप्त पुरस्काराचे नाव व पुरस्काराचे वर्ष पुढीलप्रमाणे. सन २०१९-२० वर्षाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार श्रीमती जयश्री प्रताप चौधरी रा. कासेगाव, ता. वाळवा, दत्तात्रय लकुळा खाडे, ता. खानापूर, बाजीराव भिमराव खोत (जाधव) रा. बागणी, ता. वाळवा. सन २०२२-२३ चा पुरस्कार श्रीमती सुलोचना महालिंग माने, ता. कवठेमहांकाळ यांना तर सन २०२२-२३ चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार संस्था हा सहाय्यक सेवाभावी संस्था, खटाव, ता. मिरज, जि. सांगली यांना जाहीर झाला आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार सन २०१९-२० हा श्री. महादेव पांडुरंग वाघमारे, रा. आंबेडकरनगर, ता. कवठेमहांकाळ यांना तर सन २०२२-२३ चा पुरस्कार श्री. तानाजी दगडु जाधव, रा. आळसंद, ता. खानापूर यांना जाहीर झाला आहे. सन २०२१-२२ चा शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक-संस्थाकरीता फक्त हा पुरस्कार नॅशनल इन्स्टिटयुट फॉर कम्युनिटी डेव्हलपमेंन्ट ण्ड रिसर्च सांगली (संस्था) माधवनगर रोड, सांगली यांना जाहीर झाला आहे. सन २०२२-२३ चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार फक्त संस्थाकरिता कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सर्वोदय वसतिगृह कासेगाव, ता. वाळवा (संस्था) यांना जाहीर झाला असल्याचे श्री. चाचरकर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# नोडल अधिकाऱ्यांनी निवडणूक विषयक कामकाज समन्वयाने करावे : डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने कार्यरत असणाऱ्या नोडल अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे बारकाईने वाचन करावे तसेच कामकाजाबाबत सहाय्यक अधिकारी-कर्मचारी यांच्याशी समन्वयाने कामकाज करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले.

निवडणुकीशी संबंधित विभागाने कशा पद्धतीने तयारी केलीआहे याचा आढावा आज जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. ते


**डॉ. राजा दयानिधी**

पुढे म्हणाले, निवडणुकीच्या अनुषंगाने ज्या ठिकाणी अजून काही कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्यास त्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी मागणी करावी तसेच ज्या विभागाला प्रशिक्षणाची आवश्यकता आहे त्यांना ते देण्यात यावे असे सांगितले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व यंत्रणांचा बारकाईने आढावा घेतला.

या आढावा बैठकीसाठी सहायक जिल्हाधिकारी अमित रंजन, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल ओसवाल, निवासी उप जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील. उप मुख्य निवडणूक अधिकारी श्रीमती नीता शिंदे यांच्यासह संबंधित नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# परिश्रमात सातत्य ठेवल्यास यश नक्कीच मिळेल

## डॉ. प्रशांत पवार : एमएचटी-सीईटी २०२४ साठी स्वेरीत ऑनलाईन 'क्रॅश कोर्स'चे उद्धाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पंढरपूर : स्वेरीने आयोजित केलेल्या मोफत ऑनलाईन 'क्रॅश कोर्स' चा प्रत्येक तास महत्त्वाचा असून यामधून आपण आत्मविश्वासाबरोबरच शासनाच्या मुख्य सीईटी परीक्षेसाठी देखील सज्ज होणार आहोत. करीअर मध्ये जर आपल्याला यश मिळवायचे असेल तर आपण करत असलेल्या प्रयत्नात सातत्य ठेवण्याची गरज आहे. ज्यावेळी गेट परीक्षा आपण क्वॉलिफाय होतो तेंव्हा आयआयटीला प्रवेश मिळवता येतो. त्याप्रमाणे आपण सीईटी परीक्षेत चांगले गुण मिळविले तर आपल्याला पुढे हव्या त्या महाविद्यालयात आणि हव्या त्या शाखेस प्रवेश मिळवता येतो. 'आपण ग्रामीण भागातील आहोत, आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे' अशा अनेक गोष्टींची मनात असलेली न्यूनगंडता प्रथम बाजूला ठेवा. चांगल्या गोष्टींच्या सहवासात राहिल्यास करिअरमध्ये यशस्वी होण्याच्या अनेक संधी निर्माण होतात. वीस दिवस मोफत असलेल्या या ऑनलाईन 'क्रॅश कोर्स' चा एकही तास बुडवू नका. कारण कमी वेळेत जास्तीत जास्त तयारी झाली पाहिजे. 'क्रॅश कोर्स'च्या माध्यमातून मिळालेले शिक्षण हे मुख्य सीईटीच्या परीक्षेचा 'पाया' असणार आहे. या वीस दिवसात तुम्हाला मिळालेले शिक्षण हे तुमच्या आयुष्याचा 'टर्निंग पॉईंट ठरेल. एकूणच परिश्रमात सातत्य ठेवल्याने यश नक्कीच मिळते.' असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या व्यवस्थापन परिषदेचे (मॅनेंजमेंट कौन्सिल) सदस्य व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सिव्हील इंजिनिअरिंग या विभागाचे प्रमुख डॉ. प्रशांत पवार यांनी केले.

इंजिनिअरिंग प्रवेशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी महाराष्ट्र शासनाची सीईटी परीक्षा देत असताना विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या परीक्षेसंदर्भात अचूक मार्गदर्शन व्हावे या हेतूने स्वेरीतर्फे दि. ११ मार्च ते ३१ मार्च २०२४ पर्यंत आयोजिलेल्या मोफत ऑनलाईन 'क्रॅश कोर्स' च्या उदघाटन प्रसंगी डॉ. प्रशांत पवार हे मार्गदर्शन करत होते. यावेळी बारावी परीक्षा दिलेले विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक असे एकूण ४०० हून अधिकजण ऑनलाईन उपस्थित होते.

या 'क्रॅश कोर्स' मध्ये फिजिक्स विषयासाठी डॉ. एस. ए. लेंडवे, केमिस्ट्री विषयासाठी डॉ. एम.एम. आवताडे तर मॅथ्स विषयासाठी डॉ. एच.एच.पवार हे अनुभवी प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. उदघाटनाच्या दिवशी प्रा. सुनील गायकवाड यांनी फिजिक्स विषयातील युनिट व मेजरमेंट तसेच फिजिक्स संबंधी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात प्रा. पी.टी. लोखंडे यांनी केमिस्ट्री विषयाचे महत्व पटवून सांगितले तर शेवटच्या सत्रात डॉ. एच.एच.पवार यांनी मॅथ्स विषयातील दुर्लक्षित समजल्या जाणाऱ्या पण महत्वाच्या असणाऱ्या गोष्टींकडे लक्ष वेधले.

संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये सुरू झालेल्या या क्रॅश कोर्समध्ये बारावी सायन्स मधून परीक्षा दिली आहे असे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांनी मोबा.नं.-९५९५९२११५४ व ९१६८६५५३६५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले आहे.

## * संपादकीय *

# इंडिया आणि एनडीए

देशातल्या सगळ्या विरोधकांनी 'इंडिया' तयार करून खरे तर भारतीय जनता पक्ष तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीएवर आघाडी घेतली होती. मात्र, विरोधकांच्या या आघाडीने देशभरात जे वातावरण तयार करायला हवे होते; तसे ते झालेले नाही. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे या आघाडीचे महत्त्वाचे आधारस्तंभ होते. मात्र, तेच भाजपच्या साथीने पुन्हा मुख्यमंत्री झाले आणि एनडीएचा एक भाग बनले. तेव्हापासूनच 'इंडिया'ची काहीशी पीछेहाट आणि दुसरीकडे भाजपप्रणित 'एनडीए'ची मात्र मुसंडी असे चित्र दिसू लागले. भारतीय जनता पक्षाने देवेगौडांच्या धर्मनिरपेक्ष जनता दलाला कर्नाटकात सोबत घेतले होतेच. त्यानंतर नितीश आले. एकीकडे कोणत्याही क्षणी निवडणुकांची घोषणा अपेक्षित असताना आंध्रमध्ये चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देसम, उडिशामध्ये नवीन पटनायक यांचा बिजू जनता दल, पंजाबात अकाली दल, उत्तर प्रदेशात चरणसिंह यांचे नातू जयंत चौधरी यांचा राष्ट्रीय लोकदल असे अनेक मित्र भाजपने जमा केले आहेत. ममता बॅनर्जी आणि त्यांचा तृणमूल काँग्रेस हा पक्ष वगळता भाजपने अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात असणाऱ्या एनडीएतील बहुतेक प्रमुख पक्षांना पुन्हा छत्राखाली आणण्यात यश मिळविल्याचे दिसते. इतके मित्र जमा करून भाजपला नेमके काय करायचे किंवा दाखवून द्यायचे आहे, असा प्रश्न यामुळे निर्माण होतो.

काँग्रेसने हिमाचल प्रदेश आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये स्पष्ट विजय मिळविल्यानंतर विरोधकांच्या दृष्टीने चांगले वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या विजयांनी तयार झालेली हवा टिकविण्यात तसेच ती देशभर नेण्यात मुख्यत: काँग्रेसला यश आलेले नाही. आज तर हिमाचल प्रदेशातील सरकारही धोक्यात आल्यासारखे दिसते. विरोधकांच्या आघाडीतील प्रमुख पक्ष या नात्याने इतर विरोधकांनी काँग्रेसला उचित मान देणे आवश्यक होते. तसे झाले नाही. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'कडे तर दुर्लक्ष केलेच पण आता बंगालमधील लोकसभेच्या सर्व म्हणजे ४२ जागांवरील तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांची घोषणाही करून टाकली. ममतांची ही भूमिका विरोधकांच्या ऐक्याला सुरुंग लावणारी आहे. काँग्रेसला सोबत न घेता ममतांनी भाजपचे मन राखले; असा ठपका जर ठेवला जात असेल तर विरोधकांच्या लढाईत विश्वासार्हता ती काय राहणार? तिकडे केरळमध्ये डाव्या आघाडीच्या प्रचाराचा नारळ वाढविताना मुख्यमंत्री पिनायारी विजयन यांनी 'भाजपशी लढाई करताना काँग्रेसला विश्वासू साथीदार मानता येणार नाही,' असे टीकास्त्र सोडले. केरळमध्ये डावी आघाडी किंवा काँग्रेस जिंकली तरी राष्ट्रीय पातळीवर भाजपच्या विरोधकांचीच बेरीज वाढणार आहे. मात्र, अशी व्यापक दृष्टी ठेवायला विजयन यांचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तयार दिसत नाही. वायनाड या राहुल गांधी यांच्या मतदारसंघातही डाव्या आघाडीतील भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ॲनी राजा यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसला तेवढीही सूट देण्याची कम्युनिस्ट पक्षांची व डाव्या आघाडीची तयारी दिसत नाही.

मोदी पहिल्यांदा पंतप्रधान झाले तेव्हा बहुजन समाज पक्षाला लोकसभेत एकही जागा मिळाली नाही, पण देशभरात राष्ट्रीय पक्ष म्हणून तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. आज मायावती यांचा पक्ष इतर कुणाशीही तडजोड किंवा जागावाटप करायला तयार नाही. मायावती यांनी गेल्या काही दिवसांत 'एकला चलो रे' ही भूमिका अनेकदा स्पष्ट केली. त्यांच्या या निर्णयातून काय होऊ शकते, ते स्पष्टच आहे. उत्तर प्रदेशाशिवाय मध्य प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्येही बहुजन समाज पक्षाला काही प्रमाणात स्थान आहे. मायावती यांच्यामुळे जे उत्तर भारतात होणार; तेच उद्या महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकर यांच्या 'वंचित बहुजन आघाडी'ने सर्वत्र स्वतंत्र उमेदवार उभे केले तर होणार आहे. अशी अनुकूल स्थिती दिसूनही भाजपमधली भरती काही थांबायला तयार नाही. राजस्थानात भाजपचे सरकार आहे. गेल्या वेळी लोकसभेत सगळ्या जागा मिळाल्या. तरीही, गेल्या काही दिवसांत छोट्यामोठ्या २५ काँग्रेस नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यात गेहलोत मंत्रिमंडळातील मंत्रीही आहेत. तिकडे केरळचे तीनदा मुख्यमंत्री राहिलेले काँग्रेसचे दिवंगत नेते के. करुणाकरन यांच्या मुलीनेही भावावर टीका करीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या सगळ्या प्रवाहात हरयाणातील भाजपचे खासदार ब्रिजेंद्र सिंग यांनी मात्र पक्षाला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. भाजपने देशभरात विविध पक्ष आणि नेत्यांच्या ज्या मोळ्या बांधल्या आहेत; त्यातून जागावाटप किती अवघड होऊन बसते, हे महाराष्ट्रात सध्या दिसतेच आहे. यात एकीकडे छोटे पक्ष हळू हळू संपत जाणे आणि दुसरीकडे सगळ्याच राजकारणाला एक सबगोलंकारी रूप येणे, अशी राजकीय प्रक्रिया घडत असते. यामुळे दोन्ही बाजूंनी काही अर्थपूर्ण, गंभीर राष्ट्रीय चर्चेची अपेक्षा यंदा आत्ताच शून्यवत झाली आहे.

# हवामान बदलाचे 'घसरण बिंदू'



जगातील सगळ्या देशांनी एकत्र येऊन प्रयत्न केल्याशिवाय हवामान बदलाची घसरण थांबणार नाही. वेळीच जाग आली नाही तर नंतर येणारी जाग वसुंधरेची बहुविध हानी कधीही भरून काढू शकणार नाही...

टिपिंग पॉइंट म्हणजे घसरण बिंदू ही संकल्पना अनेक क्षेत्रात दिसते. एखाद्या व्यवस्थेत असा एक टप्पा येतो, की तो ओलांडल्यावर पुन्हा मूळ स्थिती परतून येणे शक्य नसते. हा टप्पा अचानक येत नाही. त्या दिशेने वाटचाल सुरू असलेली दिसते. पण एका क्षणी कडेलोट होतो आणि त्यानंतर ती व्यवस्था पार बदलून जाते. हिरोशिमा-नागासाकी हा इतिहासाला वळण देणारा निर्णायक टिपिंग पॉइंट. त्यानंतर जागतिक राजकारणाचे गणित पूर्ण वेगळे झाले आणि नवी महासत्ता उदयाला आली. 'इंटरनेट'मुळे जीवनशैली हळूहळू बदलताना दिसत होती. पण मोबाईल डेटापॅक स्वस्त झाला, आणि या टिपिंग पॉइंटनंतर अगदी खेड्यापाड्यातले आयुष्यही वेगाने पालटले.

हवामान बदलासाठी आता टिपिंग पॉइंटचा गंभीरपणे विचार होऊ लागला आहे. काही महिन्यांपूर्वी दुबईत आंतरराष्ट्रीय हवामान परिषद भरली होती. त्यावेळी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार हवामान बदलाचे पंचवीसहून अधिक 'घसरण बिंदू' (टिपिंग पॉइंट्स) निश्चित झाले आहेत. प्रवाळांचा समूळ नाश किंवा ग्रीनलंडमधील हिमतट कोसळून जाणे अशासारखे त्यातले 'घसरण बिंदू' कधीही घडतील, इतके निकट येऊन ठेपले आहेत. त्यांचा प्रचंड मोठा परिणाम आपण भोगणार आहोत. आणि कितीही प्रयत्न केला तरी आपण परिस्थिती पूर्वपदावर आणू शकणार नाही. टिपिंग पॉइंट्स कधी येतील यांचं गणिती मॉडेल तयार करता आलं तरी ते अचूक नसतं. कोणत्या ना कोणत्या कारणाने जागतिक परिसंस्थेत किंचित जरी फेरफार झाला तरी हे टिपिंग पॉइंट्स जलदगतीने जवळ येतात. एका अर्थाने आपल्या सर्वांच्या डोक्यावर या टांगत्या तलवारी आहेत.पर्माफ्रॉस्ट म्हणजे कायम गोठलेला बर्फ. मात्र, आता कॅनडातील बोरियल पर्माफ्रॉस्ट वितळू लागल्याच्या बातम्या येत आहेत. तो पूर्ण वितळून गेल्याचा टिपिंग पॉइंट आपण ओलांडला तर प्रचंड पूर येतील. गोठलेल्या थरांमधले घातक वायू वातावरणात जातील. त्यातील काही वायू ग्लोबल वॉर्मिंग वाढायला हातभार लावणारे आहेत. शिवाय, त्या थरांमध्ये अडकून गोठलेले सूक्ष्मजीव पुन्हा सक्रिय होतील. करोना महासाथीचा अनुभव गाठीशी असल्याने या परिणामांचा धोका लगेच लक्षात येईल. पश्चिम अंटार्क्टिकातील बर्फाचे आवरण वितळून जाणे हा कधीही प्रत्यक्षात येईल असा आणखी एक टिपिंग पॉइंट. कार्बन उत्सर्जन कितीही कमी केलं तरी हे आवरण नाहीसे होणे आता अपरिहार्य आहे. फक्त केव्हा, हाच सवाल उरला आहे. ही बर्फाची चादर पूर्णपणे वितळल्याने महासागरांची उंची पाच मीटरने वर जाईल. परिणामी किनार्यावरची अनेक शहरं पाण्याखाली जातील. जगात एक तृतीयांशहून जास्त लोक किनारपट्टीच्या आसपास राहतात. त्यात न्यूयॉर्क आणि मुंबईसारखी महानगरे आहेत. तिथले व्यवसाय नियोजन करून आधी हलवून घेता येतील. पण किनाऱ्यापासच्या लहानमोठ्या गावांचे नामोनिशाण उरणार नाही. कित्येक बेटे पूर्ण नाहीशी होतील. मासेमारीसारखे उद्योग आधीच संकटात आहेत. समुद्राशी निगडीत बाकीचे व्यवसाय किती आणि कसे टिकून राहतील हे सांगणे कठीण आहे.उपग्रहांच्या मदतीने नासा ग्रीनलंडच्या हिमतटाचे सतत निरीक्षण करत आहे. तो कोसळून गेल्यावर त्याचे पाणी महासागरांमध्ये वाहत आले तर अशीच परिस्थिती उद्भवणार आहे. त्यावेळी तर समुद्राची पातळी सात मीटरने वर जाईल, असा अंदाज आहे. महासागर इतके वाढले की पृथ्वीचा स्वत:भोवती फिरण्याचा वेग किंचित मंदावेल आणि त्यामुळे दिवसात सुमारे दोन मिलिसेकंदांची भर पडेल. याचा दीर्घकालीन परिणाम ऋतूंवर दिसून येईल. अर्थात, आजच आपण हे परिणाम अनुभवत असल्याने त्याचे आणखी काय रूप पहायचे हा प्रश्न आहे.

एका बाजूने उत्तर अटलांटिक सागरातला आणि दुसऱ्या बाजूने थोडा उबदार नॉर्वेजियन प्रवाह असा उपध्रुवीय सागरी प्रवाहांचा समूह (जायर) आहे. त्यात गेली काही वर्षे संथपणा दिसून येत आहे. तो आणखी मंदावला किंवा पूर्ण थांबला तर अमेरिका आणि युरोपमधील सागरी परिसंस्थेवर प्रचंड परिणाम होईल. अन्नउत्पादन झपाट्याने घटेल आणि पूर्ण जगाच्या अन्नसुरक्षेवर गदा येऊ शकते. त्या दृष्टीने हा टिपिंग पॉइंट अनेक अर्थांनी धडकी भरवणारा आहे.पाचपैकी शेवटचा चिंताजनक टिपिंग पॉइंट आहे उष्ण प्रवाहातील प्रवाळ द्विपांचा नाश. आज अनेक ठिकाणचे प्रवाळ मृत होऊन पांढरे पडल्याच्या बातम्या येत आहेत. मासे अनेकदा प्रवाळद्वीपांवर अंडी घालतात आणि त्यावर पुढची पिढी पोसली जाते. हे सारे संपून जाईल ही कल्पनाच भयावह आहे. उद्या प्रवाळ नसतील तर त्याआधारे राहणारी संपूर्ण परिसंस्था नष्ट होऊन जाईल. या परिसंस्थांच्या अभावी किती खोलवर परिणाम होईल याचा आपला अंदाज अपुरा ठरू शकतो. मात्र, जाग येईल तेव्हा काही करण्याची वेळ टाळून गेलेली असेल.या व्यतिरिक्तचे इतर निर्णायक बिंदूदेखील कमी गंभीर नाहीत. ग्लोबल वॉर्मिंग आपण रोखू शकलो नाही तर येत्या काही वर्षांमध्ये सरासरी जागतिक तापमान दीड अंश सेल्शियसच्या वर जाईल. त्यावेळी आणखी काही टिपिंग पॉइंटस नजीक येऊन पोचतील. खारफुटी आणि समुद्रगवत समूळ नष्ट होणे, अमेझॉन जंगल पूर्ण ओसाड पडणे, हिमनद्या वितळून डोंगर उघडे पडणे, महासागरांमधले इतर प्रवाह बदलून जाणे, आणि उत्तरेला असलेल्या आर्क्टिक प्रदेशातील बर्फाचे थर पार वितळणे. या सार्यांचे दूरगामी परिणाम काय होतील हे आता तुम्हीआम्हीदेखील सांगू शकतो.हवामान बदलाच्या धोकादायक टिपिंग पॉइंट्सवर उपाय म्हणून आपण सकारात्मक टिपिंग पॉइंट्स घडवून आणू शकतो. नूतनीकरणक्षम उर्जेची किंमत अतिशय वाजवी करणे, किंवा इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देऊन त्यांची संख्या वाढवणे, यांच्यासारखे. त्यातला एक आहे नेट झिरो. एकीकडे वातावरणात जाणारा कार्बन घटवत जायचा. दुसरीकडून वातावरणात असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी करत जायचे. अशी दुहेरी हाताळणी करत जेवढा कार्बन वातावरणात सोडला जाईल तेवढाच वातावरणातून काढला जाईल.



# अंबाबाई आराखड्याला जिल्हास्तरीय समितीची मंजूरी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरा विकास प्राधीकरणअंतर्गत करण्यात आलेल्या १४४८ कोटींच्या आराखड्याला सोमवारी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजुरी दिली.

महापालिकेचा आराखडा व प्राधीकरणअंतर्गत आराखडा या दोन्हींमध्ये समावेश असलेली कामे व त्याची रक्कम एका आराखड्यातून वगळून ही मंजूरी देण्यात आली. लोकसभा निवडणुकीनंतर जूनमधील अर्थसंकल्पात प्राधीकरण आराखड्यासाठी निधीची तरतूद करण्याचा प्रयत्न करू अशी माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सोमवारी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात अंबाबाई मंदिर विकास प्राधीकरण आराखड्याबाबत जिल्हास्तरीय समितीची बैठक झाली. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बैठकीला जिल्हाधिकारी अमोल येडगे, आमदार जयश्री जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे एस. आर. पाटील, देवस्थान समितीचे अभियंता सुयश पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महापालिकेने अंबाबाई मंदिर परिसर विकासासाठी बनविलेल्या २५५ कोटींच्या आराखड्याअंतर्गत ४५ कोटींच्या निधीला मंजूरी मिळाली आहे. त्या आराखड्यात व नव्याने बनविण्यात आलेल्या अंबाबाई मंदिर विकास प्राधीकरण अंतर्गत बनविलेल्या आराखड्यात दर्शन मंडप, पार्कींग सारखी काही कामे आली आहे. या दोन्ही आराखड्यांचे प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आले आहेत. त्याची स्क्रुटिनी करताना एकच काम दोन्ही आराखड्यात असल्याने एका आराखड्यातून ते काम व त्याची रक्कम वगळण्यात यावी अशी सूचना शासनाकडून आली आहे. ही दुरुस्तीची कामे वगळून सुधारीत आराखड्याला जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

# साताऱ्यात लवकरच हेल्मेट सक्ती होणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा: जिल्ह्यात अपघातातील बळींची संख्या वाढत असल्याने जिल्हा पोलिस प्रशासन चिंतेत आहे. त्यामुळे भविष्यात हे अपघात रोखण्यासाठी कठोर पावले उचलणे गरजेचे असून, कार चालविताना सीटबेल्ट आणि दुचाकी चालविताना हेल्मेट सक्ती करण्याच्या निष्कर्षापर्यंत पोलिस पोहोचले आहेत.

जिल्ह्यात रोज अनेक ठिकाणी भीषण अपघात होत आहेत. यामध्ये अनेकांना आपला नाहक जीव गमवावा लागत आहे. रस्त्यातील खड्डे, धोकादायक वळण, ब्लॅकस्पॉट हटविण्यात आले तरी सुद्धा मृत्यूचा आकडा का वाढत आहे. यावर जिल्हा पोलिस दलाने आढावा घेतला. त्यावेळी कार चालविताना सीटबेल्ट आणि दुचाकी चालविताना हेल्मेट न घातल्यामुळे अनेकांचा जीव गेल्याचे समोर आले. परिवहन आयुक्तांनी मार्च २०२२ मध्ये हेल्मेट सक्तीचे परिपत्रक काढले होते. हेल्मेट आणि सीटबेल्ट बंधनकारक करण्यात आले असताना अनेकजण हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करीत नाहीत. त्यामुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे.

रस्ते अपघातात मृत्यू झालेल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अपघातात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर विमा कंपनी देखील अपघातावेळी दुचाकी चालकाने हेल्मेट घातले होते का किंवा चारचाकी चालकाने सीटबेल्ट लावला होता का, याची पडताळणी करते. त्यामुळे हेल्मेट व सीटबेल्ट घातल्यास आपला जीव वाचविता येईल. तसेच विम्यासाठी क्लेम करणे देखील सोयीचे होते. या सर्व बाबींचा विचार करून सातारा जिल्ह्यात लवकरच हेल्मेट सक्ती करण्यात येणार आहे. सुरूवातीला वाहनधारकांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. त्यानंतर कठोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी सांगितले.

# गावासाठी १०१ कोटींचा निधी, ग्रामस्थांनी आमदाराची काढली हत्तीवरून मिरवणूक!

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इंदापूर : कळंब (ता. इंदापूर) येथे आमदार दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते १०१ कोटी २० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व उद्घाटन रविवारी (दि.१०) पार पडले. गावासाठी भरघोस निधी मंजूर केल्याने ग्रामस्थांनी आमदार दत्तात्रय भरणे यांचे फटाक्याच्या आतषबाजीत स्वागत केले. तसेच, हलगीच्या निनादात हत्तीवरून मिरवणूक काढली.



या मिरवणुकीनंतर ग्रामपंचायत कार्यालय येथे जाहीर सभा पार पडली. यावेळी आमदार दत्तात्रय भरणे म्हणाले की, या गावामध्ये वाड्या-वस्त्यांवर पाण्याचा गंभीर प्रश्न होता. महिला भगिनींच्या डोक्यावरील हंडा कायमचा उतरवण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. राज्यमंत्री असताना पालकमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून जल जीवन च्या माध्यमातून ५५ कोटी रुपयांची योजना या गावांमध्ये आणली. शेतीच्या पाण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवण्याकरिता भूमिका घेतली.

दरम्यान, हत्तीवरून मिरवणूक काढल्यानंतर आमदार दत्तात्रय भरणे यांनी ट्विट करत संपूर्ण ग्रामस्थांचे आभार मानले आहेत. ते म्हणाले, हा गौरव नक्कीच अभूतपूर्व होता, या गौरवामुळे येणाऱ्या काळात काम करताना मला नक्कीच प्रेरणा आणि ऊर्जा भेटेल हे मात्र नक्की. संपूर्ण ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानतो. या विकास निधीमुळे ग्रामीण जनतेचे दैनंदिन जीवन सुखरूप होईल हे मात्र नक्की. माझ्या केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांना कळंबवासीयांनी आज गावामध्ये माझी हत्तीवरून मिरवणूक काढून मी केलेल्या कामाचा गौरव केला आहे.

माझ्या विकासनिधीतून व मंत्रालयातून तालुक्यासाठी लागणारा निधी उपलब्ध कसा होईल यासाठी नेहमीच मी प्रयत्नशील असतो. याच प्रयत्न मुळे आपल्या कळंब ग्रामपंचायतला माझ्या विकास निधीतून १०१ कोटी २० लाख रुपयाची तरतूद करण्यात आली. आपल्या तालुक्यातील प्रत्येक माणसापर्यंत विकास कामे पोचली पाहिजे, गोरगरिबांपर्यंत सरकारने दिलेला निधी पोहोचला पाहिजे हा प्रामाणिक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आजपर्यंत मी काम करत आहे. विकास हा तळागाळातून झाला पाहिजे, हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून मी गेली अनेक वर्षे काम करत आहे, असे आमदार दत्तात्रय भरणे यांनी म्हटले आहे.

# शक्तिपीठ महामार्गासाठी एक इंचही जमीन देणार नाही: कोल्हापुरातील बाधीत गावांचा निर्धार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : हजारो शेतकऱ्यांना भुमिहीन करून रस्त्यावर आणणाऱ्या शक्तीपीठ महामार्गासाठी एक इंचही जमीन घेऊ देणार नाही, शासनाने जबरदस्तीने भुसंपादन सुरू केले तर आम्ही आत्महत्या करू असा जळजळीत इशारा कोल्हापुरातील संभाव्य बाधीत गावातील शेतकऱ्यांनी सोमवारी जिल्हा प्रशासनाला दिला. शक्तिपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे, शेती आमच्या हक्काची नाही कोणाच्या बापाची, शेती वाचवा देश वाचवा, शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय असो, देणार नाही देणार नाही जमीन आमची देणार नाही अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

नागपूर- गोवा शक्तीपीठ महामार्ग कोल्हापुरातील ५९ गावांमधून जाणार मोठ्या प्रमाणात शेतजमिनीचे व घरांचे संपादन केले जाणार आहे. आधीच नागपूर-रत्नागिरी महामार्गासाठी भूसंपादन झालेले आहे, पून्हा संपादन झाले तर नागरिक रस्त्यावर येतील त्यामुळे याला ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. आपला विरोध शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्यावतीने सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यात बाधीत होणाऱ्या गावातील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संजयबाबा घाटगे म्हणाले, वारंवार भुसंपादन करून जिल्ह्यातील भूमिपुत्रांना भूमीहीन केले जात आहे. या पट्ट्यात सर्वत्र बागायती शेती असून शेतकऱ्यांचे न भरून निघणार नुकसान होणार आहे. याआधी काळम्मावाडी धरणासाठी, कालव्यांसाठी, नागपूर-रत्नागिरी महामार्गासाठी अशा अनेक कारणांसाठी भूसंपादन झाले आहे. आता गरज नसताना शक्तीपीठ महामार्गाचा घाट घातला जात आहे, त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत जमिनी देणार नाही.

गिरीष फोंडे म्हणाले, एकीकडे न्याय्य हक्कांसाठी लढताना शेतकऱ्यांचा मृत्यू होत आहे, शेतकरी स्वामीनाथन आयोगाची मागणी वर्षानुवर्षे करत आहे पण शक्तिपीठ महामार्गाची मागणी नसताना शासन कंत्राटदार, रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व मंत्र्यांच्या ढपल्यासाठी हा महामार्ग शेतकऱ्यांच्या वर लादत आहे. दोन महामार्ग उपलब्ध असताना पर्यावरण विरोधी, टोल आकारणारा, शेतकऱ्यांना कवडीमोल नुकसान भरपाई देणारा असा हा शक्तिपीठ महामार्ग रद्द झालाच पाहीजे. आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून ५९ गावात मेळावे घेऊन ठराव केले जातील व अध्यादेशाची होळी केली जाईल. यावेळी उदय नारकर, शिवाजी मगदूम, दादा पाटील, आनंदा पाटील, पूजा मोरे. नामदेव पाटील यांच्यासह किसान सभेचे कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, महामार्गाला शेतकऱ्यांच्या असलेल्या तीव्र विरोधाची कल्पना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना दिली जाईल. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा रोष पत्करणे योग्य नाही. त्यामुळे लवकरच यासाठी बैठक घेण्यासाठी प्रयत्न करेन.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

# सातारा जिल्ह्यातील ३२ मंदिरात वस्त्रसंहिता लागू




**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा : देशातील अनेक मंदिरे, गुरूद्वार, चर्च, मशिदच्या ठिकाणी वस्त्रसंहिता लागू आहे. त्यामुळे मंदिराचे पावित्र्य जपणे महत्वाचे असल्याने सातारा जिल्ह्यातीलही ३२ मंदिरात भारतीय संस्कृतीनुसार वस्त्रसंहिता लागू करण्याचा निर्णय विश्वस्तांनी घेतलेला आहे. तर महाराष्ट्रात ४५७ मंदिरात वस्त्रसंहिता लागू झाली आहे, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट यांनी दिली.

सातारा येथील समर्थ सदनमध्ये आयोजित पत्रकार परिषेत घनवट बोलत होते. यावेळी महासंघाचे जिल्हा निमंत्रक शिवाजीराव तुपे, ॲड. दत्तात्रय कुलकर्णी, गजानन भोसले, ॲड. दत्तात्रय सणस, रुपा महाडिक, हेमंत सोनवणे आदी उपस्थित होते.

सुनील घनवट म्हणाले, महाराष्ट्र शासनाने २०२० मध्ये राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात वस्त्रसंहिता लागू केली आहे. इतकेच नाही तर देशातील अनेक मंदिरे तसेच प्राथनास्थळे, खासगी आस्थापना, शाळा, महाविद्यालये, पोलिस प्रशासन आदी ठिकाणीही वस्त्रसंहिता लागू आहे. याच धर्तीवर मंदिराचे पावित्र्य, शिष्टाचार, संस्कृती जपण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या बैठकीत सातारा जिल्ह्यातील ३२ मंदिरांच्या विश्वस्तांनी वस्त्रसंहिता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रत्येकाला आपल्या घरी आणि सार्वजनिक ठिकाणी कोणते कपडे घालावीत याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, मंदिर हे धार्मिकस्थळ आहे. तेथे धार्मिकतेला अनुसरूनच आचरण व्हायला हवे, असे सांगून धनवट पुढे म्हणाले, गेल्यावर्षी ५ फेब्रुवारीला महाराष्ट्र मंदिर न्यासमध्ये महाराष्ट्र मंदिर

## महाराष्ट्र मंदिर महासंघाकडून माहिती

महासंघाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर महासंघाचे कार्य वाढतच गेले. सध्या हे कार्य संपूर्ण राज्यात पोहोचले आहे. सध्या देशात उज्जैनचे श्री महाकालेश्वर मंदिर, महाराष्ट्रातील श्री घृणेश्वर मंदिर, वाराणसीचे काशी-विश्वेवर, आंध्रप्रदेशातील तिरुपती बालाजी, केरळातील प्रसिध्द श्री पद्मनाभस्वामी, कन्याकुमारीचे श्री माता मंदिर, ओडिसातील जगन्नाथ मंदिर अशा मंदिरांमध्ये अनेक वर्षांपासून भाविकांसाठी सात्विक वस्त्रसंहिता लागू आहे.

सातारा तालुका

श्री दुर्गामाता मंदिर पंचपाळी हौद राजवाडा, श्री बहुलेश्वर मंदिर व्यंकटपुरा, श्री कृष्णेश्वर मंदिर, श्री अजिंक्य गणेश मंदिर राजवाडा, श्री महाकालिका मंदिर देवी चौक, श्री शनि मंदिर ५०१ पाटी, श्री प्रताप मारुती मंदिर प्रतापगंज पेठ, भैरवनाथ मंदिर करंजे, श्री कोटेश्वर मंदिर शुक्रवार पेठ, श्री मारुती मंदिर मेघदूत कॉलनी, श्री गणेश मंदिर आशीर्वाद कॉलनी संभाजीनगर आणि श्री विसावा मारुती मंदिर.

वाई तालुका

श्री भद्रेश्वर शिव मंदिर. तर भुईंज येथील श्री महालक्ष्मी, श्री मारुती, श्री खंडोबा, श्री महादेव, महर्षी भृगू ऋषी समाधी मंदिर, श्री एकविरा माता, श्री भवानीमाता आणि श्री राम मंदिर तसेच जांब येथील श्री चिलाई देवी व श्री भैरवनाथ मंदिरात वस्त्रसंहिता लागू करण्यात आलेली आहे.

सातारा तालुका

श्री चौंडेश्वरी माता मंदिर नागठाणे आणि श्री यवतेश्वर महादेव मंदिर.

कऱ्हाड तालुका

श्री भैरवनाथ मंदिर मसूर. कऱ्हाड शहरातील श्री अंबामाता मंदिर, श्री हनुमान, श्री विठ्ठल, श्री राम आणि समर्थ स्थापित हनुमान मंदिर यांचा समावेश आहे.

खटाव तालुका श्री नाथ मंदिर

अशी असेल वस्त्रसंहिता..

तोकडे कपडे घालून मंदिरात जाता येणार नाही

मंदिरात फाटकी जीन्स वापरता येणार नाही

अश्लील अन् अंग प्रदर्शन करणारी कपडे परिधान करणाऱ्यांना प्रवेश नसेल

# मुख्यमंत्र्यांनी आपल्या नेत्यांना आवरावं

## अजित पवार गटाच्या नेत्याचा थेट इशारा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीत जागा वाटपांवरून कलगीतुरा सुरू असल्याचे पाहायला मिळते. शिवसेनाएकनाथ शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अजित पवारांवर केलेल्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी आपल्या नेत्यांना आवरावं, अन्यथा कल्याण लोकसभेवर वेगळा निकाल लागू शकतो, असे म्हणत राष्ट्रवादीचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात आव्हान देण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्या विरोधात भाष्य केलं आहे. लोकसभा निवडणुकीत बारामतीतून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढणार असा इशाराच त्यांनी दिला



आहे. यावर आनंद परांजपे म्हणाले, काल शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांनी अत्यंत चुकीची प्रतिक्रिया अजित पवारांबद्दल दिल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती आहे, त्यांनी आपल्या नेत्यांना आवरावं. अन्यथा आम्ही देखील राष्ट्रवादीचे स्वाभिमानी कार्यकर्ते आहोत. कोणाला वाटत असेल की कल्याण लोकसभा जिंकणे खूप सोपं आहे. तर राष्ट्रवादीचा स्वाभिमानी कार्यकर्ता वेगळा निकाल कल्याण लोकसभेवर लागू शकतो, असे आनंद परांजपे यांनी म्हटले आहे.

ठाण्यातील तीनही लोकसभेवर कोण उमेदवार देतात त्यांचा प्रश्न आहे, पण आम्हाला विश्वास आहे तीनही जागांवर महायुतीचा उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येईल. महायुतीतील प्रत्येक पक्षाला लवकरच सन्मानपूर्वक जागा मिळणार असून राष्ट्रवादीचे सर्व उमेदवार घड्याळ चिन्हावर लढतील. तसंच महायुतीचे उमेदवार ठाणे, कल्याण, भिवंडी मतदारसंघातून विक्रमी मतधिक्याने निवडून आले पाहिजे. मात्र, विजय शिवतारे वैयक्तिक अजेंडा जर चालवत असतील तर मुख्यमंत्र्यांनी त्यांना योग्य ती समज दिली पाहिजे. महायुतीचे चांगले वातावरण राहावं, असं जर मुख्यमंत्र्यांना वाटत असेल तर, आपले वाचाळवीर विजय शिवतारेना समज द्यावी. आमच्या शक्तिस्थळवर आघात करत असतील तर स्वाभिमानी राष्ट्रवादीचा कार्यकर्ता कल्याण लोकसभेवर वेगळं चित्र निर्माण करू शकतात, असा इशारा आनंद परांजपे यांनी दिला आहे.

# आमदार निलेश लंके आजच शरद पवार गटात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई - अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवार गटात सामिल झालेले निलेश लंके आता पुन्हा घरवापसी करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे निलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या उपस्थितीत आज शरद पवार गटात प्रवेश करत आहेत. पुण्यातील कार्यालयात हा सोहळा होत असून शरद पवारांकडून निलेश लंके यांची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनीही निलेश लंकेंना आपल्यासोबत येण्याचे आवाहन केले होते.



आगामी लोकसभा निवडणुकांची घोषणा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून शिवसेना उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने काही जागांवर उमेदवारांची घोषणाही केली आहे. जागावाटपावरुन राजकीय पक्षांच कसरत होत असून अहमदनगरच्या राजकारणात अत्यंत रंजक घडामोडी पाहायला मिळत आहेत. भाजपा नेते आणि खासदार सुजय विखे यांच्या अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ सध्या केंद्रबिंदू ठरला आहे. कारण, गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांचे नाव अहमदनगर दक्षिणमधील संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहे. त्यातच, निलेश लंके आजच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याचे वृत्त एबीपी माझा या वृत्तवाहिनीने दिले आहे.

राष्ट्रवादीतील फुटीनंतर पारनेरचे आमदार निलेश लंके अजित पवार गटासोबत राहिले. मात्र, गेल्या काही दिवसांपासूनची त्यांची भूमिका पाहात ते ते कोणत्याही क्षणी शरद पवार गटात प्रवेश करतील, अशी जोरदार चर्चा आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी निलेश लंके यांना जाहीरपणे आपल्यासोबत येण्याची साद घातली होती. लोकनेते लवकर निर्णय घ्या, दक्षिण नगरमध्ये महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची 'तुतारी' वाजवा, अशा शब्दांत अमोल कोल्हे यांनी निलेश लंके यांना थेट ऑफरच दिली होती. त्यावर, लंकेंडून कुठलीही प्रतिक्रिया आली नाही. मात्र, आज थेट शरद पवार गटात प्रवेश आणि त्यांची उमेदवारी जाहीर होणार असल्याचे दिसून येत आहे.

निलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मतदारसंघात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी निलेश लंके यांच्या बॅनर्सवर शरद पवार यांचा फोटो दिसला होता. त्यामुळे, ते आजही मनाने शरद पवारांसोबतच असल्याची चर्चाही त्यांच्या मतदारसंघात होती. आता, लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ते निर्णय घेत असून विखे पाटलांसाठी व अजित पवार गटाला हा मोठा धक्का मानला जात आहे.

# वसंत मोरे यांची पुण्यात नेमकी ताकद किती?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**




पुणे : सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारे, प्रश्न सुटेपर्यंत राज्यकर्ते आणि प्रशासनाशी दोन हात करणारे, सामाजिक बांधिलकी जपून प्रसंगी पक्षनेतृत्वाविरोधी भूमिका घेणारे आक्रमक पण तितकेच भावनिक नेते वसंत मोरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची किंबहुना राज ठाकरे यांची साथ सोडून पक्षासोबतचा १८ वर्षांचा प्रवास थांबवला आहे. पक्ष सोडताना राज ठाकरे यांच्याविषयी कोणतीही तक्रार नाही असे स्पष्ट करत पुणे शहरातील पदाधिकाऱ्यांवर आरोप करून त्यांनी पक्षाला 'जय महाराष्ट्र' केला आहे.

मला लोकसभा निवडणूक लढण्याची इच्छा होती, माझी तयीरीही सुरू होती, परंतु तरीही माझ्याविरोधात पक्षनेतृत्वाकडे चुकीचे अहवाल दिले गेले, असे सांगत पुढची दिशा पुणेकर ठरवीतल, असे वसंत मोरे यांनी जाहीर केले. त्याचवेळी परतीचे दोर मी कापले आहेत, असा संदेशही त्यांनी राज ठाकरे यांना दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर त्यांची पुढची राजकीय दिशा काय असेल? लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर ते कोणत्या पक्षात प्रवेश करतील? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

वसंत मोरे हे २००७ पासून पुणे महापालिकेत नगरसेवक आहेत. प्रत्येक वेळी ते नवनवीन प्रभागांतून निवडून आलेले आहेत. कात्रजच्या दोन्ही बाजूकडील म्हणजे बालाजीनगरपासून अगदी आंबेगाव पठार ते खडकवासला विधानसभा मतदारसंघावर देखील वसंत मोरे यांचा प्रभाव आहे. इकडे वसंत मोरे यांना मानणारा मोठा मतदार आहे. हडपसर मतदारसंघात तर जवळपास २५ ते ३० हजारांचा मुस्लीम मतदार वसंत मोरे यांच्या मागे उभा आहे. याच मतदारांसाठी वसंत मोरे यांनी राज ठाकरेंच्या भोंगेविरोधी भूमिकेला समर्थन दर्शवलेलं नव्हतं. पुणे शहरातील काही भाग हा बारामती लोकसभेत तर काही भाग शिरूर लोकसभेत मोडतो. दोन्ही लोकसभेवर काही अंशी वसंत तात्या प्रभाव टाकू शकतात.

वसंत मोरे यांनी मनसेकडून मागील निवडणूक हडपसर मतदारसंघातून लढवली होती. त्यांनी जवळपास ३५ हजार मतदान घेतलं होतं. दरम्यान, पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलंय. राष्ट्रवादीत फूट पडल्याने हडपसरचे स्थानिक आमदार चेतन तुपे हे अजित पवार गटात आहेत. त्यामुळे महायुतीतून जर विद्यमान आमदाराला म्हणजेच चेतन तुपे यांना जागा सोडायची म्हटलं तर योगेश टिळेकर यांना उमेदवारी मिळणार नाही. अशावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचा उमेदवार हडपसरमध्ये असेल कारण हडपसरची जागा शिवसेना वा काँग्रेस पक्ष लढवणार नाही. त्यामुळे स्थानिक गणिते लक्षात घेऊन वसंत मोरे शरदचंद्र पवार गटात प्रवेश करू शकतात. त्यांच्यासारखा तडगा उमेदवार असल्याने तिथे निवडून येण्याची त्यांची शक्यताही बळावते. राष्ट्रवादी, काँग्रेस आणि शिवसेनेचे कार्यकर्ते वसंत मोरे यांचे नेटाने काम करतील, शिवाय त्यांच्या स्वत:चंही काही मतदान असल्याने त्यांचा विधानसभेत जाण्याचा मार्ग सुकर होईल, जो मनसेत असताना झाला नाही.

# सातारा जिल्ह्यात दुष्काळ जाहीर



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा : जिल्ह्यात गेल्यावर्षी कमी पर्जनम्यमान झाल्याने दुष्काळी स्थिती आहे. त्यामुळे शासनाने वाई आणि खंडाळा तालुक्याबरोबरच जिल्ह्यातील अनेक मंडलात दुष्काळ जाहीर केला. मात्र, अजुनही सवलती लागू होत नाहीत, असा आरोप करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक पाऊल उचलले आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलास देण्याची मागणीही केली आहे.

याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सातारा जिल्ह्यातील अनेक विभागांत गेल्यावर्षी कमी पाऊस पडल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने फक्त दुष्काळ जाहीर करुन बोळवण केली. परंतु, कोणत्याही दुष्काळी सवलतीचा लाभ अथवा दिलासा शेतकऱ्यांना मिळालेला नाही. यासाठी सवलती तत्काळ लागू कराव्यात. त्याचबरोबर पाऊस कमी पडल्याने शेतीतून योग्य उत्पादन मिळाले नाही.

चार प्रमुख पिके जिल्ह्यात होतात. यामधील कोणत्याही पिकाला सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे योग्य दरच मिळालेला नाही. दुधालाही भाव नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आहे. अशा कारणाने संपूर्ण बाजारपेठ शांत आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील अर्थचक्र थांबलेले आहे. राज्य शासनाने दुष्काळाची घोषणा केली. पण, आजपर्यंत कोणताही लाभ दिला नाही. यासाठी चार दिवसांत आढावा घेऊन सवलती लागू करण्याची गरज आहे.

कर्ज पुनर्गठन व सर्व शेती कर्ज वसुलीस स्थगिती ही घोषणा निव्वळ धूळफेक आहे. यामुळे शेतकऱ्यांना कोणताही लाभ होत नाही. केंद्र शासनाने गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांना कोणतीही दिलासा देणारी गोष्ट केलेली नाही. यापेक्षा कर्जमाफी पुनर्गठन असल्या फसव्या गोष्टी करण्यापेक्षा संपूर्ण वर्षाच्या कर्जावर व्याज माफ करुन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. कृषी सवलत योजना लागू आहे. त्यात ४ टक्के व्याज परतावा केंद्र आणि राज्य शासन देत असते. याच योजनेचा विस्तार वाढवून दुष्काळी परिस्थिती म्हणून सर्वच कर्जांचे व्याज माफ करावे. शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्क सवलत फक्त जाहीर झाली आहे. जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी सक्तीने शुल्क वसूल केले आहे. दुष्काळ जाहीर झाला आहे त्या विभागातील विद्यार्थी कुठेही शिक्षण घेत असेल तर त्यांना सवलत द्यावी. तसेच याबाबत प्रशासनाने खात्री करावी, अशीही आमची मागणी आहे. अन्यथा संबंधित संस्था आणि शाळांसमोर शुल्क वसूली आंदोलन टप्प्याटप्प्याने करण्यात येईल.

शेती पंपाच्या विजबिलाबाबत संपूर्ण माफी मिळावी. कारण, शेतीसाठी ८ तास तोही कमी दाबाने वीजपुरवठा करुन शासन शेतकऱ्यांकडून २४ तासांचे विजबिल भरून घेत आहे. यातून अनेक वर्षे महाघोटाळा होत आहे. सामान्य शेतकऱ्यांना लुटले जात आहे. दुष्काळात कोणताही शेतकरी शेतीपंपाचे विजबिल भरणार नाही. वीजजोडणी तोडल्यास जशास तसे उत्तर देण्यात येईल. सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे ऊसबिल कायद्याप्रमाणे दिले नाही. ऊस दर नियंत्रण कायद्याचा भंग केला आहे.

दुष्काळी परिस्थितीत अजून शेतकरी अडचणीत आणला जात आहे. अशा सर्व कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करुन नियमाप्रमाणे १५ टक्के व्याजासह शेतकऱ्यांना ऊसबिल देण्यात यावे. दुष्काळी परिस्थितीमुळे धरणातील पाणीसाठा सत्तेचा गैरवापर करून काही नेतेमंडळी चोरी करुन नेत आहेत. नियमबाह्य पाणी नेणार्यावर तत्काळ कारवाई करावी, अशीही आमची मागणी आहे.

# जागांचा तिढा; इच्छुकांची घालमेल अन् मतदार संभ्रमात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : 'कोल्हापूर' व 'हातकणंगले' लोकसभा जागांचा पेच अद्याप न सुटल्याने तर्कवितर्कांचे धुमारे दोन्ही मतदारसंघात फुटू लागले आहेत. यामुळे इच्छुकांची घालमेल सुरू असली, तरी मतदारही काहीसा संभ्रमात दिसत आहे. हे जरी खरे असले तरी समोर ताकदवान मल्ल कसा आहे, त्याचा अंदाज घेऊनच महाविकास आघाडी व महायुतीकडून राजकीय पटावर प्यादी पुढे सरकवले जाणार आहेत.

वास्तविक महायुतीकडे विद्यमान खासदार असल्याने त्यांची नावे पहिल्या यादीतच जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र, तसे न झाल्याने उमेदवारीबाबत संभ्रमावस्था आहे. 'कोल्हापूर'च्या दोन्ही जागा शिवसेनेला जाणार असा त्यांचा दावा आहे, पण



एकूण त्यांच्या हालचाली पाहता दोन पैकी एक जागा भाजपला हवी आहे. त्यातूनच वेगवेगळी नावे पुढे येऊ लागली आहेत. त्यात महाविकास'कडून शाहू छत्रपती यांचे नाव निश्चित झाल्याने त्यांना खासदार मंडलिक टक्कर देऊ शकतील का? त्यातूनच तर्कवितर्काचे धुमारे फुटू लागल्याने मंडलिक समर्थकांची घालमेल वाढली आहे. त्यामुळे गेले आठ दिवस मंडलिक क्शन मोडवर आले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जातानाच त्यांना उमेदवारीचा शब्द देण्यात आला होता. त्याची आठवण करून दिली जात आहे. मतदारसंघात खासदार मंडलीक यांची दोन-अडीच लाख मते आहेत, त्यांना डावलून ऐन वेळी दुसरे नाव पुढे केले तर मंडलीकांची बंडखोरी अडचणीची ठरू शकते. हे गणितही भाजप नेत्यांना माहिती असल्याने मंडलीक हेच उमेदवार म्हणून कायम राहतील, असे सध्याची तरी स्थिती आहे.

'हातकणंगले'तून आघाडीची राजू शेट्टी यांच्यावर भिस्त आहे. ते आघाडीत येण्यास फारसे उत्सुक नाहीत किंवा त्यांना उघडपणे यायचे नाही. शेट्टी विरुद्ध खासदार धैर्यशील माने अशी लढत झाली तर माने यांच्या समोरील अडचणी वाढू शकतात. त्यात महायुतीतील नेते माने यांना उघड विरोध करू लागल्याने येथे काय होणार आहे ? याचा अंदाज भाजपला आला आहे. त्यातूनच पर्यायांची चाचपणी सुरु झाली आहे. यातूनच आमदार विनय कोरे, शौमिका महाडीक, राहुल आवाडे यांच्या नावाची चर्चा सुरू झाली असली, तरी खासदार माने सहजासहजी ही जागा हातून सोडणार नाहीत. भाजप कोणत्याही निवडणुकीची तयारी फार अगोदरपासून करतो. या उलट निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या, तरी उमेदवारावरून विरोधी पक्षात गोंधळाची स्थिती पाहावयास मिळते. भाजपने एक वर्षापासून टप्प्याटप्प्याने सर्व्हे केले आहेत. यामध्ये 'कोल्हापूर' व 'हातकणंगले' मतदारसंघात अपेक्षित यश दिसत नसल्याने त्यांनी चाचपणी सुरू केली आहे, ही वस्तूस्थिती आहे.


राजू शेट्टी महाविकास आघाडीत आले नाहीतर शिवसेनेकडून अनपेक्षितपणे नाव पुढे आणले जाणार आहे. रविवारी मुंबईत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा झाली असून यातून मतदारसंघाच्या पश्चिमेकडील तालुक्यातील युवा नेत्याचे नाव 'मातोश्री'वरून पुढे आले आहे.

# कायदयाला धरून आरोपींची ओळख परेडच घेतलेली नाही; बचाव पक्षाचा युक्तिवाद

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खून प्रकरणाचा तपास करताना कायदयाला धरून ओळख परेड घ्यायला हवी. परंतु ती घेण्यात आलेली नाही. कारण केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला (सीबीआय) हे माहिती होतं की विशेष न्यायाधीशांसमोर ओळख परेड घ्यायची झाली तर साक्षीदार आरोपींना ओळखू शकणार नाहीत. त्यामुळे काहीतरी कागद दाखल करायचा म्हणून सादर केला आहे. यात ओळख परेड न करता त्यांनी साक्षीदाराकडून फक्त छायाचित्रे ओळखून घेतली. पण ती छायाचित्रेही साक्षीदाराने नीट ओळखली नाहीत असा युक्तिवाद बचाव पक्षाचे वकील वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी मंगळवारी (दि. ११) केला.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येचा खटला विशेष न्यायाधीश पी. पी. जाधव यांच्या न्यायालयात सुरू आहे. त्यामध्ये बचाव पक्षातर्फे ड.



**डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरण**

वीरेंद्र इचलकरंजीकर यांनी अंतिम युक्तिवाद केला.आरोपींनी घटनास्थळ, ते कुठून आले?, कुठून गेले? हे दाखविले असल्याचे सीबीआय म्हणते. पण त्यांचे म्हणणे धादांत खोटे व रचलेले आहे. या प्रकरणात सीबीआयने दोन साक्षीदार तपासले. आरोपींची छायाचित्रे साक्षीदारांनी सीबीआयच्या कार्यालयात ओळखली असे सांगण्यात आले. पण तेही खोटे आहे. साक्षीदाराचे उलट म्हणणे आहे की बरेच दिवस झाले. मला आता आठवत नाही, अंतरही बरेच होते. त्यामुळे मी खात्रीने सांगू शकत नाही. यातही फक्त कळसकर चा फोटो दाखविला, अंदुरेचा दाखविलाच नाही. मग दोघांचे फोटो ओळखले असे कसे म्हणता येईल? साक्षीदाराने कोर्टात सांगितले की मी सीबीआयला हेच म्हणालो की ते तसेच दिसतात पण हे तेच आहेत असे म्हणालो नाही. तसेच दिसतात आणि तेच आहेत यात फरक आहे. त्यामुळे हा सर्व बनाव रचलेला असल्याचा दावा बचाव पक्षाने केला. तसेच सचिन अंदुरे याला अटक केल्यानंतर त्याची एका कागदावर सही घेण्यात आली. त्यानंतर कागदावर हवे ते लिहिण्यात आले आहे.अशाच प्रकारे शरद कळसकर याचाही पंचनामा करण्यात आला आहे. हे दोन्ही पंचनामे शेजारी ठेवून पाहिले तर एकच फाईल आहे फक्त नावे बदलली आहेत असे दिसते. हे असे कसे ? असा सवालही बचाव पक्षाने केला. दरम्यान, उद्याही (दि. १२) सकाळी बचाव पक्षाचा युक्तिवाद होणार आहे.

# काँग्रेसने जाहीर केली ४३ उमेदवारांची दुसरी यादी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवीदिल्लीः आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आपल्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यत आसाम, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान आणि दमण दीवमधील ४३ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. मध्य प्रदेशातील हायप्रोफाईल जागा मानल्या जाणाऱ्या छिंदवाडा मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे पुत्र नकुलनाथ यांना तिकीट दिले आहे. तर, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे पुत्र वैभव गेहलोत यांना जालोर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

**पाहा काँग्रेसची दुसरी यादी**

**राजस्थानमधील उमेदवार**

राजस्थानमधील लोकसभेच्या २५ पैकी १० जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. त्यात जालोरमधून वैभव गेहलोत, बिकानेरमधून गोविंद मेघवाल, चुरुमधून राहुल कासवा, झुंझुनूमधून बृजेंद्र ओला, अलवरमधून ललित यादव, भरतपूरमधून संजना जाटव, टोंकमधून हरीश मीना, जोधपूरमधून करणसिंग उचियाराडा, उदयपूरमधून ताराचंद मीना आणि चित्तौडमधून उदयलाल अंजाना यांना उमेदवारी दिली आहे.

**मध्य प्रदेशातील उमेदवार**

मध्य प्रदेशातील ज्या १० जागांसाठी उमेदवार



जाहीर करण्यात आले आहेत, त्यामध्ये छिंदवाडामधून नकुलनाथ, भिंडमधून फूलसिंग बरैया, टिकमगडमधून पंकच अहिरवार, सतनामधून सिद्धार्थ कुशवाह, सिधीमधून कमलेश्वर पटेल, मंडलामधून ओंकार सिंग मरकाम, देवासमधून राजेंद्र मालवीय, धारमधून राधेश्याम मुवेल, खरगोनमधून पोरलाल खर्ते, बैतूलमधून रामू टेकाम यांना तिकीट मिळाले आहे.

**आसाममधील १४ पैकी १२ जागांसाठी उमेदवार जाहीर**

काँग्रेसने आसाममधील लोकसभेच्या १२ जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. कोक्राझारमधून गर्जन मश्रे, धुबरीतून रकीबुल हसन, बारपेटामधून दीप बयान, दारा उदलगुरीमधून माधब राजवंशी, गुवाहाटीमधून मीरा बोरठाकूर गोस्वामी, दिपूमधून जयराम आंगलोंग, करीमगंजमधून हाफिज रशीद अहम चौधरी, सुराज्यातून सिलसिलेवार, नागावमधून बोरदोलोई, काझीरंगातून रोसेलिना टिर्के, सोनितपूरमधून प्रेमलाल गंजू आणि जोरहाटमधून गौरव गोगोई यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

**उत्तराखंडच्या ती उमेदवारांची घोषणा**

उत्तराखंडमधील चार जागांवर काँग्रेसने आपले उमेदवार घोषित केले आहेत. टिहरी गढवालमधून जोतसिंग गुंटसोला, गढवालमधून गणेश गोदियाल आणि अल्मोडामधून प्रदीप टमटा यांचा समावेश आहे. तर दमण आणि दीवमध्ये केतन दह्याभाई पटेल यांना तिकीट देण्यात आले आहे.

**गुजरातमध्ये ७ जागांसाठी उमेदवार जाहीर**

काँग्रेसने जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत गुजरातमधील २६ पैकी ७ जागांसाठी उमेदवार घोषित केले आहेत. पक्षाने कच्छमधून नितीश भाई लालन, बनस्कांठामधून गेनीबेन ठाकोर, अहमदाबाद पूर्वमधून रोहन गुप्ता, अहमदाबाद पश्चिममधून भरत मकवाना, पोरबंदरमधून ललित भाई वसोया, बारडोलीमधून सिद्धार्थ चौधरी, वलसाडमधून अनंत भाई पटेल यांना उमेदवारी दिली आहे.

काँग्रेसने या यादीत ७ जनरल, १३ ओबीसी, १० एससी, ९ एसटी आणि एका मुस्लिम उमेदवाराला तिकीट दिले आहे.

# जागावाटपात आम्हालाही विश्वासात घ्या

## मित्रपक्षाचा महायुतीला इशारा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जागावाटपावरून महाराष्ट्रातील सत्ताधारी असलेल्या महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू आहे. जागावाटबाबत महायुतीमधील भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात एकमत होत नाही आहे. त्यातच आता महायुतीमधील लहान पक्षांनीही आक्रमक भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपावरून महाराष्ट्रातील सत्ताधारी असलेल्या महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू आहे. जागावाटबाबत महायुतीमधील भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात एकमत होत नाही आहे. त्यातच आता महायुतीमधील लहान पक्षांनीही आक्रमक भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. महायुतीच्या जागावाटपामध्ये आम्हालाही विश्वासात घ्या अन्यथा आम्ही आमचा निर्णय



घेऊ असा इशारा, बच्चू कडू यांनी दिला आहे.

महाविकास आघाडीकडून सुरू असलेल्या लोकसभेच्या जागावाटपाबाबत बच्चू कडू म्हणाले की, जसे समोरचे येतील तशी आम्ही समोर पावलं टाकू. आमची कुणाशी बोलणी झालेली नाही. आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत आहोत. मात्र आता याबाबत भाजपानं पुढाकार घ्यावा. नाही घेतला तरी आमची काही हरकत नाही. आमची त्यांना विनंतीही नाही आहे. त्यांनी पुढाकार घ्यावा. सोबत घ्यायचं की नाही हा त्यांचा प्रश्न आहे. एक पाऊल त्यांनी समोर टाकावं, आम्ही दहा पावलं टाकू. बाजूनं टाकलं तर त्यांच्या बाजूनं टाकू. विरोधात टाकलं तर विरोधात टाकू, असा सूचक इशारा बच्चू कडू यांनी दिला.

दरम्यान, महायुतीमधील जागावाटपाबाबत अद्याप कुठलाही निर्णय होऊ शकलेला नाही. मिळत असलेल्या माहितीनुसार राज्यात भाजपा ३२ ते ३६ जागांवर लढण्याची तयारी करत आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या वाट्याला फारशा जागा येण्याची शक्यता नाही आहे.

# पाचवी, आठवीच्या वार्षिक परीक्षा एप्रिलमध्ये शाळा स्तरावर

## प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश : शासन आदेशानुसार आयोजनाच्या सूचना

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : यंदाच्या शैक्षणिक वर्षात पाचवी आणि आठवी वार्षिक परीक्षा घेण्यात येणार आहे. राज्य मंडळाचा अभ्यासक्रम असणाऱ्या सर्व मान्यता प्राप्त शाळांनी एप्रिल महिन्यात वार्षिक परीक्षा घ्याव्यात. सर्व शाळांनी आपल्या स्तरावर परीक्षेचे आयोजन करावे, यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी मीना शेंडकर यांनी केले.

परीक्षा व्दितीय सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारीत असणार आहेत. वार्षिक परीक्षांसाठी पाचवीला प्रथम भाषा, व्दितीय भाषा, तृतीय भाषा, गणित व परिसर अभ्यास हे विषय असतील. इयत्ता आठवीसाठी प्रथम भाषा, व्दितीय भाषा, तृतीय भाषा, गणित, विज्ञान व सामाजिक शास्त्र हे विषय असणार आहेत. सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन योजनेतील संकलित मूल्यमापन दोन म्हणजेच वार्षिक परीक्षा असणार आहे. परीक्षेसाठी प्रत्येक शाळेने शाळास्तरावर प्रश्नपत्रिका तयार करुन परीक्षा घ्यावयाची आहे. शाळांनी प्रश्नपत्रिका विकसन करताना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांनी त्यांच्या ीी.रल.ळप या संकेत स्थळावर पाचवी आणि आठवी वार्षिक परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका तसेच संविधान तक्ते उपलब्ध करुन दिलेले आहेत. याचा उपयोग करुन प्रश्नपत्रिका तयार कराव्यात.

पाचवी आणि आठवीच्या वार्षिक परीक्षेत विद्यार्थी ज्या विषयात उत्तीर्ण होऊ शकणार नाहीत, शाळेमार्फत त्या विषयासाठी अतिरिक्त पूरक मार्गदर्शन प्रदान करुन वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पुर्नपरीक्षा देण्याची संधी देण्यात येणार आहे. पुनर्परीक्षेचे आयोजन देखील शासन आदेशानुसारच संबंधीत शाळांनी करावयाचे आहे.

दरम्यान, शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खासगी अनुदानित शाळांमधील तिसरी ते आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा, गणित व तृतीय भाषासाठी (एकूण १० माध्यम) तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यापैकी आतापर्यंत पायाभूत चाचणी व संकलित मूल्यमापन एकचे आयोजन करण्यात आले आहे. संकलित मूल्यमापन दोनचे आयोजन २, ३, ४ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे.

# अशोक चव्हाणांमुळे भाजपला फायदा होईल?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नांदेड : भारतीय जनता पक्षामध्ये कोणी प्रवेश केला तर त्याचा फायदाच होतो. मी स्वतः राष्ट्रवादी मधून भाजपात आलो आहे. तेव्हा भाजपाला माझा फायदाच झाला आहे. अशोक चव्हाण हे भाजपात आले आहेत. त्यांचा नांदेडमध्ये भाजपाला फायदाच होणार आहे, अशी प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी दिली.विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त केंद्रीय मंत्री कपिल पाटील आज नांदेडला आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राज्यातील भाजपाच्या १२ खासदारांना लोकसभेची उमेदवारी मिळणार नसल्याची माहिती आहे. यावर कपिल पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. राज्याची कोअर कमिटी ही केंद्राच्या कोअर कमिटीला अहवाल देत असते. त्यावर निर्णय होत असतो. यावर संभाव्य उमेदवार कोण हे कोणीच सांगू शकत नाही असं पाटील म्हणाले. नांदेड लोकसभेचा उमेदवार कोण यावर देखील कपिल पाटील यांनी प्रतिक्रिया दिलीय. नांदेड असो की देशातील लोकसभेच्या ५४३ जागांवर नरेंद्र मोदी हेच उमेदवार असतील असे मिश्किल उत्तर कपिल पाटील यांनी दिले.

# सैनिक कल्याण विभागातील पदभरतीसाठी मुदतवाढ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील गट-क ची पदे भरण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरीता दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजीचे सकाळी ११ वाजल्यापासून ते दिनांक ३ मार्च २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत हा कालावधी देण्यात आला होता. लोकहितार्थ ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी दिनांक ४ मार्च २०२४ ते २४ मार्च २०२४ संध्याकाळी ६ वाजेपर्यंत वाढविण्यात आला आहे. सर्व माजी सैनिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सांगली यांनी केले आहे.

# प्रत्येक तालुक्यात शिवाजी महाराजांचे स्मारक; विखे पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

श्रीरामपूर : शहरात गेल्या ४० वर्षांपासून रखडलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा विषय मार्गी लागला. भाजपचे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालणारे सरकार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात महाराजांचे स्मारक उभारणार आहे. त्याची सुरवात श्रीरामपुरातून झाली, अशी माहिती महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

येथील आझाद मैदानावर अतुल्य सेवा सन्मान पुरस्कारांचे वितरण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. भाजपचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, तालुकाध्यक्ष दीपक पटारे, समन्वयक नितीन दिनकर, शिवाजीराव कपाळे, अविनाश कुदळे, केतन खोरे, सुरज सूर्यवंशी, रामपाल पांडे, प्रसन्न धुमाळ,



मारुती बिंगले यावेळी उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, जिल्ह्यातील तरुणांना रोजगार देण्यासाठी कौशल्य विकास संस्था उभारण्यात येणार आहे. नगर, राहाता व श्रीरामपूर येथे या संस्था सुरू करू. मागील आठवड्यात नगर दक्षिणमध्ये कौशल्य विकास कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तेथे २५ हजार बेरोजगार तरुण आले होते. त्यातील ७ हजार तरुणांना तेथे रोजगार देता आला. कौशल्य विकासातून उद्याच्या पिढीला समृद्ध करणे हे आपले कर्तव्य आहे. सबका साथ सबका विश्वास या भाजपच्या नाऱ्यामुळे लोकांचा विश्वास वाढला आहे. तळागाळातील जनतेपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कार्य पोहोचविण्याचा आपला प्रयत्न आहे. देश पातळीवर गोसेवा आयोगाची स्थापना झाली. राज्यामध्ये आपण त्या खात्याचा मंत्री झाल्यानंतर राज्य गोसेवा आयोगाची स्थापना केली. त्या माध्यमातून गोशाळा निर्माण करण्याचा उद्देश आहे.

शहराची वाढती लोकसंख्या गृहित धरून पुढील २५ वर्षांचा विचार करून १७८ कोटी रुपयांची पाणी योजना मंजूर करून दिली. योजनेचे काम लवकरच सुरू होणार आहे, असे विखे पाटील म्हणाले.

# वणव्याने घेतला दोन मुक्या जिवांचा बळी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

वाई : वाई तालुक्यात वणवे लागण्याचे प्रमाण काही केल्या कमी होत नाहीत. त्याचे दुष्परिणाम दिवसेंदिवस वाढू लागले आहेत. अज्ञात विघ्नसंतोषी मंडळींनी लावलेल्या वणव्यात पिराचीवाडी येथील एका शेतकऱ्याचा जनावरांच्या गोठ्याला धग लागून दोन मुक्या जनावरांचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

वाई तालुक्यात वणवे लागण्याच्या घटना सतत घडत आहेत. पसरणीचा डोंगर, मांढरदेवचा डोंगर, वैराटगडाचा



डोंगर असे डोंगर पेटून काळे ठिक्क पडत आहेत. ते वाचवण्यासाठी पर्यावरणप्रेमींचा आटोकाट प्रयत्न सुरू आहे. असे असतानाच वाईच्या उत्तर बाजूला असलेल्या धावडी गावालगतच्या डोंगरावर अज्ञात व्यक्तींकडून रविवारी दुपारी वणवा लावण्यात आला. तो वणवा वाऱ्याच्या वेगाने भडकला.

वणव्याने वाळलेल्या गवताबरोबरच सागाची, शिवरीची झाडे कवेत घेत रौद्र रूप धारण केले. वणव्याची दाहकता वाढत होती. हा वणवा त्याच गावालगत असलेल्या पिराचीवाडी येथील दशरथ कोचळे यांच्या जनावराच्या गोठ्याजवळ पोहोचला. आगीच्या ज्वाळांनी गुरांचा गोठा वेढला गेला. घटनेची माहिती मिळताच शेतकरी व ग्रामस्थांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले; परंतु गोठ्यातील एक खोंड आणि एका गायीचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान, वाई वनविभागाकडून वणवा आटोक्यात आणण्याचे काम सुरू होते, अशी माहिती स्थानिक ग्रामस्थांनी दिली.

# शस्त्राने वार करत तरूणाची हत्या

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भंडारा : वादातून दोघांनी एका तरुणावर चाकुने सपासप वार केले. यात तरूण जागीच गतप्राण झाला. कपील अशोक उजवणे (३१, भगतसिंग वॉर्ड टाकळी) असे मृताचे नाव आहे. ही घटना सोमवार मध्यरात्रीच्या सुमारास शहराला लागून असलेल्या टाकळी येथे घडली असली, तरी मंगळवारला सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी भंडारा पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

हत्येनंतर कपीलचा मृतदेह लपविण्यासाठी नालीत फेकून त्यावर दुचाकी ठेवण्यात आली. ऋषभ संजय दोनोडे (२०) आणि करण दिलीप भेदे (२०) दोन्ही रा. भगतसिंग वॉर्ड टाकळी अशी मारेकऱ्यांची नावे आहेत. मंगळवार सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास ही घटना उजेडात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. पोलिसांना माहिती मिळताच ताफा घटनास्थळी दाखल झाला.

पंचनाम्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी भंडारा जिल्हा शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. पोलिसांनी ऋषभ दोनोडे आणि करण दिलीप भेदे यांच्यावर भादंविच्या कलम ३०२, २०१, ३४ अन्वये गुन्हा नोंदवून अटक केली आहे. तपास पोलिस निरीक्षक गोकुळ सुर्यवंशी करीत आहेत.

# मराठा आरक्षणाला तातडीने स्थगिती देण्यास मुंबई हायकोर्टाचा नकार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतल्यानंतर या आरक्षणाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी त्यांच्या पत्नी ॲड. जयश्री पाटील यांच्या माध्यमातून मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. मात्र मराठा आरक्षणाला तातडीने स्थगिती देण्यास हायकोर्टाने आज झालेल्या सुनावणीत नकार दिला आहे. तसंच सदावर्ते यांच्या याचिकेबाबत पुढील दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करावे, असे आदेशही कोर्टाने राज्य सरकारला दिले आहेत.

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांकरिता आरक्षण विधेयक काही दिवसांपूर्वी घेण्यात आलेल्या विशेष



अधिवेशनादरम्यान सभागृहात एकमताने मंजूर करण्यात आलं. मराठा समाजासाठी दहा टक्के आरक्षणासाठी घेतलेला हा निर्णय कायद्याच्या कसोटीवर टिकणारा असल्याचं त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं होतं. मात्र सरकारच्या या निर्णयाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर आज झालेल्या सुनावणीदरम्यान कोर्टाने तातडीने मराठा आरक्षणाला स्थगिती देण्यास नकार दिल्याने राज्य सरकारला दिलासा मिळाला आहे.

मुंबई हायकोर्टाने आज मराठा आरक्षणाला स्थगिती देण्यास नकार दिला असला तरी मराठा आरक्षणानुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेवर राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सदावर्तेंच्या याचिकेवर दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करावे आणि या प्रतिज्ञापत्रावर आठवड्याभरात याचिकाकर्त्यांनी उत्तर सादर करावे, असे आदेश कोर्टाकडून देण्यात आले आहेत.

दरम्यान, नवीन मराठा आरक्षणानुसार करण्यात येणारी भरती व शैक्षणिक दाखले देताना ते कोर्टाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहतील, असं मुंबई हायकोर्टाने राज्य सरकारला शुक्रवारी स्पष्ट बजावले होते. राज्य सरकारने नवीन कायद्यांतर्गत १६,००० पदे निर्माण केली आहेत.

# गुजरातमध्ये तब्बल ४८० कोटींचा ड्रग्सचा साठा पकडला, सहा पाकिस्तानींना अटक!

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भारतीय तटरक्षक दल, गुजरात एटीएस आणि एनसीबी यांनी अरबी समुद्रात मोठी कारवाई केली. भारताने अंमली पदार्थांच्या व्यापाराला मोठा धक्का दिला आहे. या संयुक्त कारवाईत सहा पाकिस्तानी नागरिकांना मोठ्या प्रमाणात ड्रग्जसह पकडण्यात आले. छउइ च्या अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती दिली आहे. अटक करण्यात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांकडून ४८० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सर्वांना पोरबंदरमध्ये ठेवण्यात आले आहे. छउइने या संयुक्त कारवाईबाबत सांगितले.

अधीक्षक सुनील जोशी यांनी या संयुक्त कारवाईबाबत




माहिती दिली की, एका गुप्त माहितीच्या आधारे भारतीय तटरक्षक दल, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो आणि गुजरात दहशतवाद विरोधी पथक यांनी आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेजवळ अरबी समुद्रात संयुक्त कारवाई केली. ११-१२ मार्चच्या रात्री ही मोहीम राबवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पोरबंदरपासून सुमारे ३५० किमी अंतरावर अरबी समुद्रात समन्वित सागरी-हवाई ऑपरेशनमध्ये भारतीय तटरक्षक जहाजे आणि डॉर्नियर विमानाने ही बोट अडवली, असे ते म्हणाले. त्यानंतर बोटीतून पाकिस्तानी सहा क्रू मेंबर आणि ८० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या औषधांची किंमत ४८० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

गेल्या एका महिन्यात अरबी समुद्रात एजन्सींनी राबवलेली ही दुसरी मोठी अंमली पदार्थ विरोधी कारवाई आहे, असेही ते म्हणाले. २६ फेब्रुवारी रोजी पोरबंदर किनाऱ्यावर पाच परदेशी नागरिकांना ३,३०० किलो चरससह अंमली पदार्थांसह पकडण्यात आले होते. तसेच एटीएस गुजरात आणि एनसीबी यांच्या संयुक्त विद्यमाने तटरक्षक दलाने गेल्या तीन वर्षांत केलेली ही दहावी अटक आहे. या कारवाईंतर्गत ३,१३५ कोटी रुपयांचे ५१७ किलो अंमली पदार्थही जप्त करण्यात आले आहेत.